## उपोद्घात

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल 31 मार्च 2024 रोजी संपलेल्या वर्षासाठी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151 अन्वये महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांकडे सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

या अहवालात, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवाशर्ती) अधिनियम, 1971 आणि त्याअंतर्गत जारी केलेल्या लेखापरीक्षण आणि लेखा विनियम, 2020 च्या तरतुदींनुसार केलेल्या राज्य शासकीय विभाग आणि स्वायत्त संस्थांच्या अनुपालन लेखापरीक्षणाचे महत्त्वपूर्ण निष्कर्ष समाविष्ट आहेत.

या अहवालात नमूद केलेली प्रकरणे ही वर्ष 2023-24 या कालावधीसंबंधी चाचणी लेखापरीक्षणादरम्यान निदर्शनास आलेल्या तसेच जी मागील वर्षांत निदर्शनास आली परंतु मागील लेखापरीक्षा अहवालांमध्ये नोंदवता आली नाही, अशा प्रकरणांपैकी आहेत. जिथे आवश्यक असेल तिथे, 2023-24 नंतरच्या कालावधीशी संबंधित प्रकरणे देखील समाविष्ट करण्यात आली आहेत.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी जारी केलेल्या लेखापरीक्षण मानकानुसार (मार्च 2017) हे लेखापरीक्षण करण्यात आले आहे.

**टीप: मूळ इंग्रजी अहवालावरून अनुवादित: शंका समाधानासाठी कृपया इंग्रजी अहवाल पाहावा.**